नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०६/०७/२०२४ (शनिवार) सकाळ

# पोलीस स्टेशन बेला येथील हिसकावून नेण्याचा गुन्हा उघड
# १२ तासाचे आत आरोपी जेरबंद

दिनांक ०५/०७/२०२४ चे दुपारी १३.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– दिपक रामचंद्र दलाल, वय ५० वर्ष, रा. वार्ड क्र. ०२, सिर्सी ता. उमरेड जि. नागपूर हा आपल्या वडीलासह त्याचे वडीलाचे खाते असलेले युको बँक सिर्सी येथे पैसे काढण्यासाठी गेले होते व तेथुन २,००,०००/– रुपये नगदी बँकेतुन काढुन लाल रंगाच्या पिशवीमध्ये टाकुन फिर्यादी हे त्याचे वडीलासह पायदळ घरी जात असतांना समोरच्या दिशेने दोन अनोळखी ईसम काळया रंगाच्या मो.सा ने येवुन मोसावर पाठीमागे बसलेल्या ईसमाने फिर्यादीच्या हातात असलेली लाल रंगाची पिशवी ज्यात २,००,०००/–रू. नगदी असलेली हिसकावुन नेल्याचे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलिस ठाणे बेला येथे अप. क्र. १८९/२४ कलम ३०४(२), ३(५) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर गुन्हयाचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखा करीत असताना तांत्रिक पद्धतीच्या आधारे सापळा रचुन नमुद गुन्हयातील **आरोपी नामे– १) शुभम उर्फ कार्तिक शंकर चंदनखेडे, वय २८ वर्ष, रा. जाम जि. वर्धा २) अशोक मुलचंद जिवनकर, वय ३३ वर्ष, रा. बुधवारी पेठ, उमरेड** यांना ताब्यात घेवून सदर गुन्हयाबाबत सखोल विचारपुस केली असता गुन्हयाची कबुली दिली. आरोपींकडुन १) नगदी १,२७,०००/– रुपये २) ५ ग्रॅम वजनी सोन्याची अंगठी कि. ३७,६५०/– रु ३) दोन मोबाईल संच किंमती २०,०००/– रु ४) गुन्ह्यात वापरलेली हिरो होंडा स्प्लेंडर मो.सा. क्र. MH-36/P-2235 कि. ३०,०००/– रु असा एकूण २,१४,६५०/– रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी व जप्त मुद्देमाल पुढील कायदेशीर कारवाई करीता पोस्टे बेला यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, उपविभागीय पोलीस अधिकारी नागपूर विभाग नागपूर श्रीमती पूजा गायकवाड यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, पोस्टे बेला येथील ठाणेदार सपोनि. अजित कदम, पो.उपनि. खंडेराव बोळगिर, स्थानिक गुन्हे शाखा नाग्रा. येथील सपोनि आशिषसिंग ठाकूर, सफौ मिलींद नांदुरकर, पोहवा अमृत किनगे, रोहन डाखोरे, अरविंद भगत चापोशी आशुतोष लांजेवार, सुमित बांगडे, सायबर सेल चे सतिश राठोड तसेच पोस्टे बेला येथील पोहवा कुणाल ठाकूर, दारासिंग राठोड, सत्येंद्र रंगारी, नापोशी अमोल काळे, वासनिक, पिंपळे, पोशी प्रशांत कुंभारे, अमोल कोटेवर, तुषार सलाम, तुलाराम चटप, चापोहवा प्रवीण नैनवर यांनी पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर